३०९

## MAHARASHTRA ACT No. XLV OF 1981

## THE INDIAN ELECTRICITY (MAHARASHTRA AMENDMENT) ACT, 1981.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राज्यपाल यांची संमती दिनांक ११ सप्टेंबर १९८१ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**एम. ए. धोले,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. XLV OF 1981.

## AN ACT FURTHER TO AMEND THE INDIAN ELECTRICITY ACT, 1910, IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA

[राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर **महाराष्ट्र शासन राजपत्रात**, दिनांक १४ सप्टेंबर १९८१ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला].

**सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४५**

**भारतीय विद्युतशक्ती अधिनियम, १९१०, हा महाराष्ट्र राज्यास लागू असताना त्यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.**

१९१० चा ९. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, भारतीय विद्युतशक्ती अधिनियम, १९१० हा महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या बत्तिसाव्या वर्षी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ. १. (१) या अधिनियमास, भारतीय विद्युतशक्ती (महाराष्ट्र सुधारणा), अधिनियम, १९८१ असे म्हणता येईल.

(२) तो, २० सप्टेंबर १९७६ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९१० चा अधिनियम क्रमांक ९ च्या

२. भारतीय विद्युतशक्ती अधिनियम, १९१०, हा महाराष्ट्र राज्यास लागू असताना, १९१० चा ९, त्याच्या कलम ७-क, पोट-कलम (५) मध्ये खंड (ख) ऐवजी पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

कलम ७-क ची सुधारणा.

" (ख) अशी कोणतीही रक्कम ही हप्त्यांमध्ये देय असेल त्याबाबतीत, उपक्रम स्वाधीन केल्याच्या तारखेपासून शेवटचा हप्ता दिल्याच्या तारखेपर्यंतच्या मुदतीसाठी, कलम ६, पोट-कलम (७) मध्ये निर्दिष्ट केलेल्या दराने व्याज देय होईल. पहिल्या हप्त्याबरोबर, उपक्रम स्वाधीन केल्याच्या तारखेपासून तो हप्ता दिल्याच्या तारखेपर्यंत, संपूर्ण रकमेवर असे व्याज देण्यात येईल. नंतरच्या प्रत्येक हप्त्याबरोबर, लगतपूर्वीचा हप्ता दिल्यापासून त्यानंतरचा हप्ता दिल्याच्या तारखेपर्यंतच्या मुदतीसाठी, लगतपूर्वीचा हप्ता दिल्यानंतर देय असलेल्या रकमेवर असे व्याज देण्यात येईल. ".

(यथार्थ अनुवाद)

न. ब. पाटील,
भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.